महाराष्ट्र शासनाचे 'इस्माईल युसूफ महाविद्यालय ' जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०.

|| म ||  मराठी विभाग  || म ||

---

श्री. समीर रामचंद्र वैरागी,
विभागप्रमुख (मराठी),
महाराष्ट्र शासनाचे 'इस्माईल युसूफ महाविद्यालय',
जोगेश्वरी (पूर्व ),मुंबई – ४०००६०.
दिनांक - २२/०२/२०२१.

प्रति ,
मा. प्राचार्य,
महाराष्ट्र शासनाचे 'इस्माईल युसूफ महाविद्यालय ',
जोगेश्वरी (पूर्व ),मुंबई – ४०००६०.

विषय- मराठी विभागातर्फे 'मराठी भाषा गौरव दिन ' साजरा करण्यासाठी अनुमती मिळणेबाबत.

महोदया,

उपरोक्त विषयानुसार मराठी विभाग आपणाकडे विनंती अर्ज करतो की,महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी दिनांक २७ फेब्रुवारी ह्या दिवशी'मराठी भाषा गौरव दिन' साजरा केला जातो. शासन आदेशानुसार मराठी विभागाला दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ (शनिवार) ह्या दिवशी ‘मराठी भाषा गौरव दिन ‘ online आयोजित करण्याची अनुमती मिळावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

[signature]

श्री.समीर रामचंद्र वैरागी

[signature] 22/02/2021

महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ
कला, [illegible] महाविद्यालय,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६०.

PRINCIPAL
Government of Maharashtra's
Ismail Yusuf College of
Arts, Science & Commerce,
Jogeshwari (East), Mumbai - 400 060

# मराठी भाषा गौरव दिन कार्यवृत्त – २०२१

मराठी विभागातर्फे शनिवार,दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन आभासी पध्दतीने करण्यात आले होते . ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ.नामदेव गपाटे {सहायक प्राध्यापक(मराठी), बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी}ह्यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. माधुरी जोशी(हिंदी विभाग प्रमुख) ह्यांनी भूषविले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन आणि कवी कुसुमाग्रज ह्यांच्याबद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकांची घोषणा करण्यात आली.ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक डॉ.एकनाथ फुटाणे ह्यांनी केले,तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहा.प्रा.समीर वैरागी ह्यांनी केले.ह्या कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती वंदना, कुसुमाग्रजांवरील महितीपटाचे सादरीकरण करण्यात आले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी ‘मराठी अभिमान गीता’चे गायन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांची

PRINCIPAL
Government of Maharashtra's
Ismail Yusuf College of
Arts, Science & Commerce,
Jogeshwari (East), Mumbai - 400 060

आवर्जून ऑनलाइन उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी विभागातील विद्यार्थ्यांचे साहाय्य लाभले.

ISMAIL YUSUF COLLEGE MUMBAI

PRINCIPAL
Government of Maharashtra's
Ismail Yusuf College of
Arts, Science & Commerce,
Jogeshwari (East), Mumbai - 400 060

प्रा.समीररामचंद्रवैरागी
मराठीविभागप्रमुख




ISMAIL YUSUF COLLEGE MUMBAI

PRINCIPAL
Government of Maharashtra's
Ismail Yusuf College of
Arts, Science & Commerce,
Jogeshwari (East), Mumbai - 400 060